


• सचिन लुंगसे •

# भुयारी मेट्रो धावणार... सुस्साट



## मेट्रोचा आराखडा

मुंबई महानगर प्रदेशात वाहतूक व परिवहन व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्याच्या उद्देशाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई मेट्रो मार्गाचा सुमारे ३३७.१ किलोमीटरचा (१४ मार्गिका) बृहत आराखडा तयार केला. त्याची नियोजनबद्ध पद्धतीने टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी सुरू आहे.

## पत्राचाळ पुनर्विकास

तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने श्रीफळ फोडून पत्राचाळ पुनर्विकास प्रकल्पाच्या उर्वरित बांधकामाची सुरुवात केली. गोरेगाव पश्चिम येथील म्हाडाच्या जमिनीवरील सिद्धार्थनगर सहकारी गृहनिर्माण संस्था (पत्राचाळ) पुनर्विकास प्रकल्पातील ६७२ मूळ गाळेधारकांच्या प्रलंबित सदनिकांच्या बांधकामाचा प्रश्न या माध्यमातून मार्गी लागणार आहे.






कुलाबा- वांद्रे- सीप्झ या पहिल्या भुयारी मेट्रो प्रकल्पातील बीकेसी ते सीप्झ हा पहिला टप्पा जून २०२३ दरम्यान सुरू करण्यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून प्रयत्न सुरू आहेत. सुरुवातीला या प्रकल्पाची किंमत २३ हजार कोटी रुपये होती. आता या प्रकल्पाचा खर्च ३३ हजार कोटींवर पोहोचला आहे. दिल्लीच्या बेसवर हा प्रकल्प हाती घेण्यात आला होता. वेगवेगळ्या कारणांमुळे या प्रकल्पाची किंमत वाढली आहे.




## सौंदर्यीकरणाचा प्रकल्प



मुंबईची प्रतिमा उंचावण्यासाठी संपूर्ण महानगराच्या सौंदर्यीकरणाचा प्रकल्प महापालिकेने हाती घेतला असून रस्ते, पूल, पदपथ, वाहतूक बेटे, समुद्रकिनारे, उद्याने इत्यादी सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता, सुधारणा, सुशोभीत हरितीकरण, आकर्षक प्रकाशयोजना अशी कामे तातडीने हाती घेतली जात आहेत.

## ट्रान्स हार्बर लिंक

एमएमआरडीएच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या मुंबई पारबंदर प्रकल्पाचे (मुंबई ट्रान्स हार्बर लिंक) काम वेगाने सुरु असून, हा प्रकल्प डिसेंबर २०२३ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे. दक्षिण मुंबईला नवी मुंबईशी जोडणाऱ्या मुंबई ट्रान्स हार्बर लिंक प्रकल्पामुळे सध्याच्या १२० मिनिटांच्या प्रवासाच्या वेळेच्या तुलनेत केवळ २० मिनिटांत जाणे शक्य होणार आहे. या प्रकल्पाची किंमत १७,८४३ कोटी आहे.

महापालिकेच्या एकूण १०.५८ किलोमीटर लांबीच्या कोस्टल रोड प्रकल्पाचे बांधकाम प्रिन्सेस स्ट्रीट उड्डाणपूल ते वांद्रे- वरळी सागरी सेतूच्या (सी लिंक) दक्षिण टोकापर्यंत करण्यात येत आहे. प्रकल्पामध्ये चार- चार मार्गिका असणारे भरणीवरील रस्ते, पूल, उन्नत रस्ते आणि बोगदे यांचा समावेश आहे. किनारी रस्ता प्रकल्पाचे काम प्रत्यक्षात ऑक्टोबर २०१८ मध्ये सुरु झाले असून नोव्हेंबर २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

